# मेट्रो ३ : दुसऱ्या टप्प्यातील चार डबे मुंबईत दाखल

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गाच्या पहिल्या ट्रेनसाठीचा चार डब्यांचा दुसरा टप्पा शुक्रवारी पहाटे आरेतील सारीपूत नगर येथे दाखल झाला आहे. चार डब्यांचा दुसरा काफिला आंध्र प्रदेशातील श्रीसिटीहून मुंबईपर्यंत १,४०० किमी.चा पल्ला गाठत दहा दिवसांनंतर पोहोचला आहे. ४२ टन वजनाचा प्रत्येक डबा खास प्रकारच्या ट्रेलरवरून आणण्यात आला. या ८-ऍक्सेल ट्रेलर्संना ६४ चाके असतात. येत्या दोन दिवसांत या डब्यांची जुळवणी करून सारीपूत नगरातील तात्पुरत्या सुविधेमध्ये एक ट्रेन थाटली जाईल. येथेच चाचणी ट्रॅकसुद्धा उपलब्ध आहे. त्यानंतर तात्पुरत्या सुविधेपासून मरोळ नाका मेट्रो स्थानकापर्यंतच्या ३ किमी. लांबीच्या ट्रॅकवर ताबडतोब चाचण्या घेण्यास सुरुवात केली जाईल.



आरेतील मेट्रो कारशेडसाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडकडून (एमएमआरसीएल) झाडे तोडण्यात आलेली नसल्याचा निर्वाळा देण्यात आला आहे. कारशेडच्या जागेत केवळ लहान झुडुपे आणि वाढलेले गवत कापण्यात येत असून, जागा मोकळी करण्यात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. एमएमआरसीएलने न्यायालयाच्या आदेशाचा भंग केलेला नाही, असेही सांगण्यात आले आहे.